## औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दिनांक 14/8/2003 रोजी सकाळी 11.00 वाजता झालेल्या 129 व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

सदर बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. मा. श्री. के. बी. गवळी. | मुख्य अधिकारी तथा उपसभापती |
| 2. मा. श्री. बबनराव देशमुख | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| 3. मा. श्री. चाँदपाशा इनामदार | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| 4. मा. श्री मकरंद सावे. | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| 5. मा. श्री. डॉ. डो. डो. शिंदे | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| 6. मा. श्री. साहेबराव खरात | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| 7. मा. श्री. वामनराव राऊत | सदस्य , औरंगाबाद मंडळ. |
| 8. मा. श्रीमती शैलेजा गायकवाड | सदस्या, औरंगाबाद मंडळ. |
| 9. मा. श्री. संजय वाघचौरे | सदस्य , औरंगाबाद मंडळ. |
| 10. मा. श्री. ॲड. राजेश्वर चव्हाण | सदस्य , औरंगाबाद मंडळ. |
| 11. मा. श्री. विश्वासराव उपासे | सदस्य, औरंगाबाद मंडळ. |
| 12. मा. श्री. मो. मुदस्सीर, | नगररचनाकार,तथा मा.उपसंचालक,नगररचना यांचे सदस्य प्रतिनिधी. |

बैठकीचे कामकाज सुरु करण्यापुर्वी मा. मुख्याधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी सर्व उपस्थित मा. सदस्य यांना माहिती दिली की, मा. सभापती औरंगाबाद मंडळ यानी, ते जिंतुर येथे महत्वाच्या कामासाठी व्यस्त असल्यामुळे मंडळाच्या बैठकीस उपस्थित राहु शकणार नसल्याने सदर बैठक मंडळाचे मुख्य अधिकारी तथा उपसभापती यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत यावी , असे दुरध्वनीवरुन सांगितले. त्यानुसार म्हाड कायदा 1976 मधील कलम 25, 26, 27 नुसार असलेल्या तरतुदीनुसार मुख्य अधिकारी तथा उपसभापती यांचे अध्यक्षतेखाली बैठकीच्या कामकाजास सुरुवात झाली.

मंडळाच्या 129 व्या बैठकीस उपस्थित असलेल्या मा. सदस्य यांचे उपसभापती तथा मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी स्वागत केले.

### विषय क्र 1 :- दिनांक 30/6/2003 रोजी झालेल्या 128 व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

दिनांक 30/6/2003 रोजी झालेल्या मंडळाच्या 128 व्या बैठकीच्या कार्यवृत्तांता विषयी विस्तृत माहिती मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास दिली. सविस्तर चर्चेअंती दिनांक 30/6/2003 रोजीच्या 128 व्या बैठकीचा कार्यवृत्तांत मंडळाने सर्वानुमते मान्य केला व निर्णय घेतला की,

**ठराव क्र 765 :** दिनांक 30/6/2003 रोजी झालेल्या 128 व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र 2 :- बाभुळगांवरोड लातूर येथील मंडळाच्या ताब्यातील सर्वे क्र. 97 (भाग) पैकी 225 चौ .मी. क्षेत्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास टाकी बांधण्यासाठी देणेबाबत.

सदर बाब टिप्पणी विषयी मुख्य अधिकारी औरंगाबाद यांनी अशी माहिती सांगितली की, बाभुळगांवरोड लातुर येथे सर्वे क्र. 97 (भाग), 98 (भाग) येथील मंडळाच्या मालकीच्या जमिनीपैकी 225 चौमी. क्षेत्राची मागणी, पाण्याची भूमिगत टाकी बांधण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेली आहे. सदर बाब प्राधिकरणास मंजूरीस्तव पाठविली असता प्राधिकरणाने सदर बाब औरंगाबाद गृहनिर्माण मंडळाचे बैठकीत घेऊन, त्याबाबतचा ठराव प्राधिकरणाकडे सादर करावा असे निर्देश दिनांक 17/5/2003 च्या पत्रान्वये दिलेले आहेत. मुख्य अधिकारी यांनी पुढे अशी ही माहिती दिली की, लातुर येथे सर्वे क्र, 97 (भाग), 98 (भाग) या खाजगी जमिनीपैकी एकुण 16.29 हेक्टर जमिन म्हाड कायदयातील कलम 41 अन्वये संपादीत केलेली आहे. या जमिनीवर मंडळाने अत्यल्प, अल्प व मध्यम उत्पन्न गटान्तर्गत योजना राबविल्या आहेत. सदर जमिनीच्या आराखडयातील 1.2262 हेक्टर जमिन टेलिफोन खात्यासाठी आरक्षित ठेवण्यात आली होती. तथापी टेलिफोन खात्याने विहित नमुन्यात फक्त 4000 चौमी. क्षेत्राची मागणी केलेली असल्याने या क्षेत्रातुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास 225 चौमी. क्षेत्र उपलब्ध करुन देता येऊ शकेल. तसेच टेलिफोन खात्याकरिता उपलब्ध करुन दयावयाच्या क्षेत्रासाठी प्राधिकरणाने रु. 420/- प्रति चौमी. दर मंजूर केला आहे त्याच दराने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास जमिन उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव या बैठकीत निर्णय घेऊन प्राधिकरणास सादर करावयाचे प्रस्तावित आहे. शिवाय उपरोक्त क्षेत्रावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे बांधण्यांत येणा-या भूमिगत टाकीतील पाण्याचा उपयोग मंडळाच्या पुर्ण झालेल्या योजनांना व भविष्यकालीन योजनेसही होऊ शकेल म्हणून सदर बाब मंडळाच्या विचारार्थ व निर्णयास्तव सादर केली आहे. करिता 225 चौमी. क्षेत्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शिफारशीसह प्राधिकरणास सादर करण्यांत यावा. याबाबतीत मंडळाचे सर्व मा. सदस्यांनी प्रतिपादन केले की, उपरोक्त क्षेत्र हे जीवन प्राधिकरणास वितरण केल्यास त्याचा फायदा मंडळाच्या गृहनिर्माण योजनेस / वसाहतीस होणार आहे म्हणून म्हाडाने मंजूर केलेल्या दराप्रमाणे होणारे मुल्य रु 94,500/- (225 ×420) आकारुन 225 चौमी. क्षेत्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शिफारशीसह प्राधिकरणास सादर करण्यांत यावा. उपरोक्त प्रमाणे प्रस्तुत विषयावर चर्चा झाल्यानंतर चर्चेअंती मंडळाने एकमताने निर्णय घेतला की,

<u>ठराव क्र 766</u> :- बाभुळगांव रोड लातुर येथील मंडळाच्या ताब्यातील सर्वे क्र. 97 (भाग) , 98 (भाग ) पैकी प्रस्तावीत 225 चौमी. क्षेत्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास टाकी बांधण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने मंजूर केलेले दर रु 420/- प्रति चौमी. आकारुन 225 चौमी. क्षेत्र ( रु. 94,500/- मुल्य वसुल करुन)महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास वितरण करण्याबावतचा प्रस्ताव अनुकुल शिफारशीसह प्राधिकरणास सादर करण्यांत यावा.ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता सदर प्रकरणी कार्यवाही करण्यांत यावी.

<u>विषय क्र 3</u> :- <u>राष्ट्रीय गृहनिर्माण कार्यक्रमांन्तर्गत स.क्र.113 (भाग) खंडेशवरी बीड येथे अत्यल्प उत्पन्न गटातील 188 गाळे बाधंणे... निविदेवर निर्णय घेणेबाबत.</u>

सदर प्रकरणी मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी मंडळाला विस्तृत माहिती दिली. त्यावेळी मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, राष्ट्रीय गृहनिर्माण कार्यक्रमान्तर्गत स. क्र. 113 (भाग) खांडेश्वरी बीड येथे अत्यल्प उत्पन्न गटातील 188 गाळे बाधंणे. या योजनेची निविदीत किंमत रुपये 71.56 लक्ष असल्याने सदर योजनेच्या निविदा स्विकृतीचे अधिकार मंडळाचे मुख्य लेखा अधिकारी व मा. मुख्य अभियंता - 2 / प्राधिकरण यांचे सहमतीनंतर मंडळास असल्याने हा विषय मंडळाच्या बैठकीपुढे निर्णयास्तव ठेवण्यांत आलेला आहे. याबाबत पुढे माहिती देतांना मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, स. क्र. 113(भाग) खांडेश्वरी बीड येथे अत्यल्प उत्पन्न गट योजनेतील 188 गाळे बांधण्याच्या कामासाठी मागविण्यांत आलेल्या निविदापैकी मे. नरसिंह कन्स्ट्रक्शन्स यांनी भरलेली निविदा निम्नतम दराची असुन ती योजनेच्या अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा (2001-2002 वर्षाच्या जिल्हा दर सुचीवर आधारीत) 9.90 टक्के अधिक दराने भरलेली आहे. सदर निविदेविषयी कार्यकारी अभियंता औरंगाबाद विभाग यांनी शिफारस करतेवेळी प्रस्तावात नमुद केले की, बीड येथील समकक्ष बांधकामाचा दर विचारात घेता व गाळयांची विक्री किंमत रुपये 45000/- प्रति गाळा एवढया मर्यादेतच ठेवण्यासाठी उपरोक्त ठेकेदाराचा निविदा दर हा जास्तीत जास्त निविदेतील अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा 6.302 टक्के जास्त एवढा असणे आवश्यक आहे. कार्यकारी अभियंता औरंगाबाद विभाग यांच्या उपरोक्त शिफारशीसह प्रस्ताव मा. उपमुख्य अभियंता औरंगाबाद मंडळ तथा संचालक पीडीसी पुणे यांचेमार्फत मा. मुख्य अभियंता - 2/ प्राधिकरण यांचेकडे निविदा सहमतीसाठी सादर करण्यांत आल्या.त्यावर मा.मुख्य अभियंता - 2/ प्राधिकरण यांनी त्यांचे दिनांक 2/8/2003 चे पत्रक्र एमएच/मु.अ./का.अ.-2/380/एनएचअे/974/03 अन्वये औरंगाबाद मंडळास कळविले की, उपरोक्त ठेकेदाराची निविदा, निविदा किंमतीपेक्षा 9.90 टक्क्यांनी जास्त आहे म्हणजे रुपये 71,56,626/-

रक्कमेची निविदा दिली आहे. ठेकेदाराने दिलेल्या दराविषयी मंडळाने ठेकेदारासमवेत वाटाघाटी करुन निविदा किंमतीपेक्षा 6.30 टक्क्यांनी जास्त या दरापेक्षा कमी या कमीत कमी दरापर्यन्त वाटाघाटी करुन निविदेचा दर कमी करावा व त्यानुसार पुढील कार्यवाही करावी. अन्यथा मात्र निविदा पुनश्च बोलविणे आवश्यक राहील.

त्याप्रमाणे मुख्य अधिकारी यांनी मंडळास असे प्रस्तावित केले की, मा. मुख्य अभियंता -2 / प्राधिकरण यांचे शिफाशीनुसार निम्नतम निविदाकार यांचेशी वाटाघाटी करण्यांत याव्यात व निम्नतम निविदाकारास दर कमी केल्यास निविदा स्विकृतीसाठी प्राधिकरणास सादर करण्यांत याव्यात. निविदा कार त्यांनी भरलेले दर कमी करण्यास तयार नसल्यास फेर निविदा बोलविण्यांत याव्यात. त्यावेळी मंडळाचे मा. सदस्य श्री. सावे, श्री. इनामदार व श्री. राजेश्वर चव्हाण यांनी असे सांगितले की, सदर योजनेच्या निविदाकारास वाटाघाटीसाठी मंडळासमोर बोलविण्यांत यावे.यावर सदर योजनेचे निविदाकार कार्यालयात उपलब्ध आहेत किंवा नाही याची माहिती घेण्यांत आली. त्यावेळी निम्नतम निविदाकाराचे अधिकृत प्रतिनिधी कार्यालयात उपलब्ध असल्याची माहिती मिळाली. मंडळाच्या मा. सदस्य यांच्या सुचनेनुसार निम्नतम निविदाकाराचे प्रतिनिधी यांना मंडळासमोर वाटाघाटीसाठी बोलविण्यांत आले. त्यावेळी मंडळाने त्यांना, त्यांनी निविदेत भरलेले दर कमी करता येतील किंवा कसे याबाबत विचारणा केली. निम्नतम निविदाकाराचे प्रतिनिधी यांनी याबाबत मंडळासमोर असे सांगितले की, त्यांनी निविदेत भरलेले दर हे बांधकाम साहित्याची लिड, बांधकाम साहित्याचा बाजारभाव, बांधकामासाठी लागणा-या पाण्याची उपलब्धता इत्यादी बाबी विचारात घेऊनच स्पर्धात्मक दर दिले आहे असे प्रतिपादन केले व त्यांनी निविदेतील दर कमी करण्यास असमर्थता दर्शविली व तसे त्यांनी लेखी कळविले आहे.

यावर मुख्य अधिकारी यांनी मंडळास असे सांगितले की, मा. मुख्य अभियंता - 2 / प्राधिकरण यांच्या शिफारशीनुसार निम्नतम निविदाकाराने त्यांनी भरलेले दर कमी करण्यास असमर्थता दर्शाविली असल्याने सदर योजनेच्या फेरनिविदा बोलविण्यांत याव्यात.

यावर मंडळाचे मा. सदस्य.श्री.सावे, श्री. इनामदार, व श्री.राजेश्वर चव्हाण यांनी असे प्रतिपादन केले की, मा. मुख्य अभियंता - 2 / प्राधिकरण यांनी दिलेल्या शिफारशीनुसार निम्नतम निविदाकाराने वाटाघाटीमध्ये त्यांनी भरलेले दर कमी करण्यास असमर्थता दर्शविलेली असल्याने फेरनिविदा बोलविल्यास, निविदा बोलविणे, निविदा स्विकृती व प्रत्यक्ष कामास सुरुवात होणे या कार्यवाहीस विलंब होईल शिवाय फेरनिविदा काढल्यास पुन्हा नेमक्या किती दराच्या निविदा प्राप्त होतील याबाबत आताच अंदाज बांधणे उचित होणार नाही. शिवाय काम सुरु होण्यास विलंब झाल्याने लाभधारक त्यांची अनामत रक्कम परत घेण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच म्हाडातर्फे राबविण्यांत येणा-या योजनांची कामे विलंबाने होतात अशी म्हाडाची प्रतिम जनमानसात होईल. सदरील बाबी विचारात घेऊन योजनेतील गाळयांचे बांधकाम लवकर सुरु व्हावे व पुन्हा निविदा बोलविल्यास त्यात कालपव्यय होईल

व गाळयांच्या किंमती आणखी वाढतील म्हणून मंडळास प्रदान करण्यांत आलेल्या अधिकार प्रदानतेनुसार विषयाधीन योजनेची मे. नरसिंह कन्स्ट्रक्शन्स यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा 9.90 टक्के अधिक या दराची निविदा स्विकृत करण्यांत यावी. यास मंडळाच्या सर्व सदस्यांनी सहमती दर्शविली.

यावर मुख्य अधिकारी यांनी पुन्हा असे सांगितले की, विषयाधीन योजनेची मे. नरसिहं कन्स्ट्रक्शन्स यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा 9.90 टक्के जास्त दराची निविदा स्विकारल्यास गाळयाची किंमत 46,340 एवढी होते. जाहिरातीमध्ये गाळयांची किंमत 45000/- एवढी दर्शविण्यात आली होती. यामुळे होणारी वाढ रुपये 1340 प्रति गाळा एवढी आहे व या वाढीव किंमतीस लाभधारकांची स्विकृतीपुर्वी सहमती घेणे आवश्यक आहे व जे लाभार्थी सदर वाढीव किंमतीस सहमती देणार नाहीत त्यामुळे रिक्त होणा-या गाळयांसाठी पुन्हा जाहिरात देऊन ठोस मागणी अजमावावी लागेल त्यामुळे योजनेतील गाळयांची संख्या कमी जास्त होण्याची शक्यता आहे. शिवाय नविन जाहिरातीनुसार ठोस मागणी मिळेल किंवा नाही हे आताच सांगणे अवघड आहे.

यावर मंडळाचे सदस्य श्री. सावे, श्री. इनामदार, श्री. राजेशवर चव्हाण यांनी असे सांगितले की, वाढीव किंमतीसाठी लाभार्थीची सहमती घेणे ही कार्यवाही स्वतंत्ररित्या करण्यांत यावी व मंडळाच्या ठरावाप्रमाणे अंमलबजावणी करण्यांत यावी.

उपरोक्त प्रमाणे प्रस्तुत विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने बहुमताने निर्णय घेतला की,

<u>ठराव क्र 767</u> :- राष्ट्रीय गृहनिर्माण कार्यक्रमान्तर्गत स. क्र. 113(भाग) खांडेशवरी बीड येथे अत्यल्प उत्पन्न गटातील 188 गाळे बांधणे या योजनेची मे. नरसिंह कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा 9.90 टक्के जास्त दराची (निविदीत रक्कम रुपये 71,56,626/-) निविदा मंजूर करण्यांत येत आहे. यामुळे गाळयांच्या किंमतीत होणारी वाढ रुपये 1340/- अंदाजीत प्रति गाळा हे लाभार्थीना कळवुन त्यांची वाढीव किंमतीस सहमती घेण्याची कार्यवाही स्वतंत्ररित्या करण्यांत यावी. तसेच जे लाभार्थी वाढीव किंमतीस सहमती देणार नाहीत अशा मुळे रिक्त होणा-या गाळयांसाठी पुन:श्च जाहिरात देऊन ठोस मागणी अजमाविण्याची कार्यवाही सुध्दा यथावकाश स्वतंत्ररित्या करण्यांत यावी. ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

विषय:- 4: - मागणी अभावी रिक्त असलेल्या गाळयांच्या किंमती प्राधिकरणाच्या धोरणानुसार कमी करुन त्याची विक्री करण्याबाबत.

या विषयाची सविस्तर माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली.

1. 68 गाळे मध्यम उत्पन्न गट, आर-26, सिडको, नविन औरंगाबाद या योजनेतील 2 गाळे मागणी अभावी रिक्त आहेत. या योजनेतील गाळयांचे वाटप दिनांक 1/7/95 पासून सुरु झाले असुन प्रथम गाळा वाटपाच्या वेळेस या योजनेतील गाळयांची किंमत रुपये 2,18,200/- एवढी होती. आजपर्यन्त केलेल्या गुंतवणूकीवरील व्याजाचे भांडवलीकरण करुन गांळयाची किंमत रुपये 5,19,156/- येते. या क्षेत्रातील बाजार भावानुसार योजनेतील गाळयांची किंमत रुपये 3,17,000/- एवढी येते. तेंव्हा म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार व मंडळास प्रदान करण्यांत आलेल्या अधिकार प्रदानतेनुसार या योजनेसाठी एक रक्कमी पध्दतीवर विक्री करण्यासाठी गाळयाची किंमत रुपये 3,17 000/- ठेवण्याचा प्रस्ताव आहे.

2. 88 गाळे मध्यम उत्पन्न गट आर 27 सिडको नविन औरंगाबाद या योजनेतील 2 गाळे मागणी अभावी रिक्त आहेत. या योजनेतील गाळयांची वाटप दिनांक 1/7/95 पासून सुरु झाले असुन प्रथम गाळावाटपाच्या वेळेस या योजनेतील गाळयांची किंमत रुपये 2,26,000/- एवढी होती. आजपर्यन्त केलेल्या गुंतवणूकीवरील व्याजाचे भांडवलीकरण करुन गाळयाची किंमत रुपये 5,40,734/- येते. या क्षेत्रातील बाजार भवानुसार योजनेतील गाळयांची किंमत रुपये 3,17,000/- एवढी येते तेंव्हा म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार व मंडळास प्रदान करण्यांत आलेल्या अधिकार प्रदानतेनुसार या योजनेसाठी एक रक्कमी पध्दतीवर विक्री करण्यासाठी गांळयाची किंमत रुपये 3,17,000/- ठेवण्याचा प्रस्ताव आहे.

3. 48 गाळे मध्यम उत्पनन गट गृहनिर्माण भवनाजवळील योजना औरंगाबाद या योजनेतील 5 गाळे मागणी अभावी रिक्त आहेत. या योजनेतील गाळयांचे वाटप दिनांक 2/11/2000 पासून सुरु झाले असुन प्रथम गाळावाटपाच्या वेळेस या योजनेतील गाळयांची किंमत रुपये 3,60,000/- एवढी होती. आजपर्यन्त केलेल्या गुंतुवणूकीवरील व्याजाचे भांडवलीकरण करुन गाळयाची किंमत रुपये 5,26,684/- येते. या क्षेत्रातील बाजार भावानुसार योजनेतील गाळयांची किंमत रुपये 4,96,811/- एवढी आहे. तसेच या क्षेत्राकरिता निबंधक कार्यालयाने ठरवुन दिलेल्या दराप्रमाणे प्रस्तुत योजनेतील गाळयांची किंमत रुपये 4,61,720/- एवढी येते . या योजनेतील गाळे, तळमजला अधिक तीन मजले अशा इमारतीमध्ये चौथ्या मजल्यावर मागील दिड ते दोन वर्षापासून रिक्त आहेत. सदर गाळयांची किंमत प्राधिकरणाने ठरवुन दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार बाजार भावाप्रमाणे म्हणजे रुपये 4,96,811/- एवढी येते. तथापी याच परिसरात उच्च उत्पन्न गटातील तळमजला

वर्षापासून मागणी अभावी रिक्त आहे. प्राधिकरणाच्या धोरणानुसार कमी केलेली या प्लॅटची किंमत रुपये 4.55 लक्ष आहे. हा प्लॅट चार खोल्याचा असुन प्रस्तुत प्रकरणातील प्लॅटसमध्ये तीन खोल्या आहेत. त्यामुळे तीन खोल्यांची किंमत ही चार खोल्याच्या प्लॅटच्या किंमतीशी तुलना केल्यास जास्त येते. वास्तवीक या दोन्हीही योजना वेगवेगळया वेळी राबविलेल्या असल्यामुळे प्लॅटच्या किंमतीत फरक आहे. याबाबतचा, सर्वसाधारण गाळेधारक विचार करीत नाहीत त्यामुळे चार रुमच्या प्लॅटपेक्षा तीन रुमच्या प्लॅटची किंमत कमी असणे क्रम प्राप्त असल्याने म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार व मंडळास प्रदान करण्यांत आलेल्या अधिकार प्रदानतेनुसार या योजनेसाठी मागणी अभावी रिक्त असलेले प्लॅटस विक्री व्हावे व मंडळाचा अडकुन पडलेला निधी मोकळा व्हावा,तसेच प्राधिकरणाचे कमीत कमी नुकसान होईल अशा रितीने प्रचलित बाजार भावापेक्षा सदर गांळयाच्या किंमती 15 टक्क्यांनी कमी करुन एक रक्कमी पध्दतीवर विक्री करण्यासाठी प्लॅटची किंमत रुपये 4,22,000/- ठेवण्याचा प्रस्ताव आहे असे मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले.

म्हाडाचा मागणी अभावी रिक्त असलेल्या गाळयामुळे अडकुन पडलेला निधी मोकळा होण्याच्या दृष्टीने गाळयांच्या किंमती कमी करुन एक रक्कमी पध्दतीने विक्री करण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार विभागीय मंडळास प्रदान करण्यांत आलेले आहेत. सदरील अधिकार प्रदानतेनुसार प्रथम प्रचलित बाजारभावाने व प्रचलित बाजारभावाने मागणी न आल्यास प्रचलित बाजारभावापेक्षा जास्तीत जास्त 20 टक्के किंमती कमी करण्याचे अधिकार मंडळास प्रदान करण्यांत आलेले आहे. अशी माहिती ,मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास दिल्यानंतर मंडळाचे मा. सदस्य डॉ. शिंदे यांनी असे सांगितले की, प्रस्तुत प्रस्तावास मान्यता दयावयास हरकत नाही. तथापी कमी केलेल्या किंमतीतही मागणी प्राप्त न झाल्यास मागणी अभावी रिक्त असलेल्या गाळयांच्या किंमत बाजार भावापेक्षाही 20 टक्क्यांने कमी करुन गाळे विक्रीचा प्रस्ताव मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करण्यांत यावा. यास सर्व सन्माननीय सदस्यांनी सहमती दर्शविली.

उपरोक्त प्रमाणे चर्चेअंती मंडळाने निर्णय घेतला की,

<u>ठराव क्र. 768 :-</u> औरंगाबाद मंडळाच्या ताब्यातील मागणी अभावी रिक्त असलेल्या गाळयांमुळे अडकुन पडलेला निधी मोकळा होण्याच्या दृष्टीने प्राधिकरणाने प्रदान केलेल्या अधिकार प्रदानतेनुसार गाळयांच्या किंमती कमी करुन एक रक्कमी पध्दतीवर विक्री करण्यास खालील प्रमाणे मान्यता देण्यांत येते.

1. 68 गाळे मध्यम उत्पन्न गट, आर- 26, सिडको, नविन औरंगाबाद या योजनेतील 2 रिक्त गाळयांसाठी एक रक्कमी पध्दतीवर विक्री करण्यास्तव विक्री किंमत रुपये 3,17,000/-.
2. 88 गाळे मध्यम उत्पन्न गट ,आर- 27 ,सिडको, नविन औरंगाबाद या योजनेतील 2 रिक्त गाळयांसाठी एक रक्कमी पध्दतीवर विक्री करण्यास्तव विक्री किंमत रुपये 3,17,000/-.
3. 48 गाळे मध्यम उत्पन्न गट, गृहनिर्माण भवनाजवळील योजना औरंगाबाद या योजनेतील 5 रिक्त गाळयांसाठी एक रक्कमी पध्दतीवर विक्री करण्यास्तव विक्री किंमत रुपये 4,22,000/-.

विषय क्र. 5:- राष्ट्रीय झोपडपटटी सुधारणा योजने अंतर्गत बीड येथील घोषित झोपडपटटयातील सामाजिक सुविधा अंतर्गत नागोबा गल्ली/माळीबेस, माळीगल्ली/खासबाग व मोमीनपुरा येथे सांस्कृतिक सभागृह, प्रसुतीगृह / आरोग्य केंद्र, गार्डन व हेल्थ क्लब बांधण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

या विषयाच्या बाब टिप्पणी विषयी मुख्य अधिकारी यांनी मंडळास अशी माहिती दिली की, बीड नगरपरिषदेने घोषित केलेल्या एकुण 20 झोपडपटटयांपैकी राष्ट्रीय झोपडपटटी सुधारणा योजने अंतर्गत सामाजिक सुविधे अंतर्गत, नागोबा गल्ली, माळीबेस, माळीगल्ली / खासबाग व मोमीनपुरा येथे सांस्कृतिक सभागृह, प्रसुतीगृह / आरोग्य केंद्र, गार्डन व हेल्थ क्लब बांधण्यासाठीचे एकुण रुपये 1,36,88,563/- रक्कमेच्या कामाचे प्रस्ताव सामाजिक सुविधासाठीच्या पात्र रक्कमेतुन मंजूर करण्यासाठी मंडळाकडे प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी सादर केले आहे. मुख्य अधिकारी यांनी असेही सांगितले की, उपरोक्त कामे करण्यासाठी शासनाने मंजूरी दिलेली आहे. तथापी या कामासाठी दरडोई रुपये 120/- प्रमाणे प्रतिपुर्ती शासनातर्फे देण्यांत येईल व उर्वरीत रुपये 80/- दरडोई खर्च हा नगरपरिषद बीडच्या स्वतःच्या निधीतुन करण्यासाठी शासनाने त्यांचे पत्र दिनांक 5/6/2003 अन्वये कळविले आहे म्हणून नगरपरिषदेने प्रस्तुत केलेल्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 1,36,88,563/- पैकी प्रशासकीय मान्यते करिता रुपये 1,25,73,493/- एवढी रक्कम पात्र ठरते. त्यापैकी रुपये 75,29,791/- च्या हददीपर्यन्तची रक्कम शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आर्थिक तरतुदीच्या मर्यादेपर्यन्त व उपलब्धतेनुसार प्रतिपुर्तीसाठी पात्र राहील, अशीही माहिती मुख्य अधिकारी यांनी दिली. विषयांकीत प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार मंडळास

असल्यामुळे बाब टिप्पणी निर्णयास्तव व मंजूरीस्तव मंडळासमोर सादर केली आहे. याबाबत मंडळाने सर्वानुमते प्रतिपादन केले की, बाब टिप्पणीत नमुद केलेल्या सर्व अटींच्या आधीन राहुन उपरोक्त कामास प्रशासकीय मान्यता देण्यांत यावी. उपरोक्त चर्चेअंती प्रस्तुत विषायावर मंडळाने निर्णय घेतला की,

ठराव क्र 769:- राष्ट्रीय झोपडपटटी सुधार कार्यक्रमान्तर्गत बीड येथील घोषित झोपडपटटीतील सामाजिक सुविंधा अंतर्गत नागोबा गल्ली / माळीवेस, माळीगल्ली / खासबाग व मोमीनपुरा येथे सांस्कृतिक, सभागृह प्रसुतीगृह / आरोग्य केंद्र, गार्डन व हेल्थ क्लब बांधण्यासाठीच्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 1,25,73,493/- च्या कामास बाब टिप्पणीत नमुद केलेल्या सर्व अटींस आधीन राहुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत असुन, त्यापैकी शासनाच्या दि. 5/6/2003 च्या आदेशानुसार दरडोई रुपये 200/- पैकी दरडोई रुपये 120/- प्रमाणे येणारी रक्कम रुपये 75,29,791/- एवढी रक्कम शासनाकडुन वेळोवेळी निर्गमीत होणा-याआर्थिक तरतुदीनुसार प्रतिपुर्तीस पात्र राहील. ठरावाच्या स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

विषय क्र .6:-राष्ट्रीय झोपडपटटी सुधारणा योजने अंतर्गत जालना येथील घोषित झोपडपटटीतील सामाजिक सुविधा अंतर्गत गांधीनगर / बालाजीनगर, ढोरपुरा / वाल्मीकनगर, कानडीमोहल्ला / ख्रिस्तकॅम्प, गुरुगोविंदनगर / कन्हयानगर / मियॉसाहाबदर्गा, लखडकोट / चित्तोडनगर, हनुमान घाट, खांडसरी, राहुलनगर नुतन वसाहत संजयनगर, सययदनगर, कैकाडी मोहल्ला, येथे सामाजिक सभागृह, प्राथमिक शाळा बांधण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

या विषयाबाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास अशी माहिती दिली की, जालना नगरपरिषदेने घोषित केलेल्या एकुण 15 झोपडपटटयापैकी 9 झोपडपटटयांमध्ये बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या तक्त्यात दर्शाविल्याप्रमाणे राष्ट्रीय झोपडपटटी सुधार योजने अंतर्गत सामाजिक सभागृह व प्राथमिक शाळा बांधणेसाठी एकुण रुपये 53,88,667/-

चे कामाचे प्रस्ताव सामाजिक सुविधा पुरविण्यासाठी मंडळाकडे प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी सादर केले आहे. मुख्य अधिकारी यांनी असेही सांगितले की, सामाजिक सुविधा अंतर्गत बीड व लातुर शहरासाठी शासनाने मंजूरी दिलेली आहे. त्याप्रमाणे दरडोई रुपये 120/- प्रमाणे प्रतिपुर्ती म्हाडातर्फे देण्यांत येईल व उर्वरीत रुपये 80/- दरडोई खर्च हा नगरपरिषदेने स्वतःच्या निधीतुन करावयाचा आहे. त्याच धरतीवर जालना नगर परिषदेने सादर केलेला प्रस्ताव बाब टिप्पणीतील तक्त्याप्रमाणे अ.क्र. 1 ते 5 हे त्या त्या झोपडपटटीतील लोकसंख्या विचारात घेऊन सुविधा प्रस्तावित केलेल्या असल्यामुळे त्यास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार मंडळास आहे व ज्या त्या झोपडपटटीतील लोकसंख्या विचारात घेतलेली असल्यामुळे प्रतिपुर्तीसाठी दरडोई रुपये 200/- प्रमाणे होणारी रक्कम पात्र राहील असेही मुख्य अधिकारी यांनी सांगितले. उर्वरीत अ.क्र. 6 ते 9 पर्यन्तची कामे लगतच्या झोपडपटटयांची लोकसंख्या एकत्रीत करुन प्रस्ताव सादर केल्यामुळे या बाबत शासनाची मान्यता घेणे आवशयक आहे असेही मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले. म्हणून नगरपरिषदेने प्रस्तावीत केलेल्या कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 53,88,667/- पैकी बाब टिप्पणीतील सोबतच्या तक्त्यातील अ. क्र. 1 ते 5 प्रशासकीय मान्यते करिता रुपये 18,85,710/- एवढी रक्कम पात्र ठरते व शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या निधीच्या उपलब्धतेनुसार प्रतिपुर्तीसाठी पात्र राहील. विषयांकीत प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार मंडळास असल्याने बाब टिप्पणी मंजूरीस्तव मंडळासमोर सादर केली आहे.

याबाबत मंडळाने सर्वानुमते प्रतिपादन केले की, बाब टिप्पणीत नमुद केलेल्या सर्व अटींच्या आधीन राहुन अ.क्र. 1 ते 5 करिता आवशयक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन घेऊन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत यावी व उर्वरीत अ.क्र. 6 ते 9 करिताचा आवशयक तो प्रस्ताव प्राधिकरणास सादर करण्यांत यावा. उपरोक्त चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

<u>ठराव क्र 770:-</u> राष्ट्रीय झोपडपटटीसुधार कार्यक्रमान्तर्गत जालना येथील घोषीत 15 झोपडपटटयातील सामाजिक सुविधा अंतर्गत एकुण 5झोपडपटटयामध्ये विविध ठिकाणी सामाजिक सभागृह व प्राथमिक शाळा बांधण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेपैकी फक्त रुपये 18,85,710/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास बाब टिप्पणीत नमुद केलेल्या सर्व अटींच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे. उर्वरीत झोपडपटटयांसाठी सामाजिक सुविधा पुरविण्याबाबतच्या प्रस्तावास शासनाची मंजूरी आवशयक असल्याने आवश्यक तो प्रस्ताव सादर करण्यांत यावा. स्थायी करणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

सभेचे मा. अध्यक्ष औरंगाबाद मंडळ यांच्या परवानगीने आयत्यावेळचा विषय

**विषय क्र .1:- <u>गट क्र. 104/1 तिसगांव औरंगाबाद येथील अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट योजनेतील गाळयांची किंमत प्राधिकरणाच्या धोरणानुसार कमी करुन एक रक्कमी पध्दतीवर विक्री करणेबाबत.</u>**

सदर प्रकरणी मंडळाचे कार्यकारी अभियंता श्री. एस. डी. पांडे यांनी सविस्तर माहिती दिली. माहिती देतांना त्यांनी असे सांगितले की, सदर योजनांपैकी अल्प उत्पन्न गट योजने अंतर्गत मंडळाने 512 पैकी 453 गाळे बांधलेले असुन यापैकी केवळ 30 ते 40 गाळे वाटप करण्यांत आले आहेत. या योजनेतील गाळयांचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर दिनांक 1/8/2001 पासून गाळयांचे वाटप सुरु करण्यांत आले. योजनेतील गाळे बांधण्यापुर्वी ठोस मागणी अजमाविण्यांत आली होती तथापी औदयोगिक क्षेत्रातील मंदी व तत्सम कारणास्तव बहुतांशी लाभार्थींनी त्यांच्या अनामत रक्कम परत घेतल्या. त्यामुळे गाळे रिक्त झाले आहेत. प्रथम गाळे वाटपाच्या वेळी सदर गाळयांची किंमत रुपये 1,08,910/- एवढी होती. आजपर्यन्त मंडळाने केलेल्या गुंतवणूकीवरील व्याजाचे भांडवलीकरण करुन गाळयांची किंमत रुपये 1,45,876/- येते, प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार सदर गाळयाची किंमत कमी करतांना गाळे प्रथम बाजारभावाने विकणे आवशयक आहे.या परिसरातील बांधकामाचा दर विचारात घेता बाजारभावाप्रमाणे (सिडको वाळुज यांचेकडील दरानुसार) गाळयांची किंमत रुपये 94330/- एवढी येते. बाजारभावाप्रमाणे येणा-या किंमतीच्या आसपास सध्या भांडवलीकरण करुन येणारी किंमत असल्यामुळे व त्यास मागणी प्राप्त होत नसल्याने गाळयांच्या किंमती भांडवलीकरण करुन येणा-या आजच्या किंमतीपेक्षा म्हणजे रु. 1,45,876/- पेक्षा 20 टक्क्यांनी कमी करण्यांचा प्रस्ताव आहे. याप्रमाणे परिगणीत केलेली गाळयांची किंमत रुपये 1,16,700/- दर्शवुन एक रक्कमी पध्दतीवर विक्री करण्याचा प्रस्ताव आहे.

सदर योजनांपैकी मध्यम उत्पन्न गट योजने अंतर्गत मंडळाने 38 गाळे बांधलेले असुन यापैकी केवळ 1 गाळा वाटप करण्यांत आला आहे. या योजनेतील गाळयांचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर दिनांक 1/8/2001 पासून गाळयांचे वाटप सुरु करण्यांत आले. योजनेतील गाळे बांधण्यापुर्वी ठोस मागणी अजमाविण्यांत आली होती तथापी औदयोगिक क्षेत्रातील मंदी, तत्सम कारणास्तव बहुतांशी लाभार्थींनी त्यांच्या अनामत रक्कम परत घेतल्या,त्यामुळे गाळे रिक्त झाले आहेत. प्रथम गाळे वाटपाच्या वेळी सदर गाळयाची किंमत रुपये 1,91,800/-

एवढी होती. आजपर्यन्त मंडळाने केलेल्या गुंतवणूकीवरील व्याजाचे भांडवलीकरण करुन गाळयाची किंमत रुपये 2,61,352/- येते प्राधिकरणाच्या प्रचीलत धोरणानुसार सदर गाळयांची किंमत कमी करतांना गाळे प्रथम बाजारभावाने विकणे आवश्यक आहे.

या परिसरातील सिडको, वाळुज यांचेकडील दरानुसार गाळयांचा बांधकामचा दर विचारात घेता गाळयांची किंमत रुपये 1,46,591/- एवढी येते. बाजारभावाप्रमाणे येणा-या किंमतीच्या आसपास सध्या भांडवलीकरण करुन येणारी किंमत असल्यामुळे व त्यास मागणी प्राप्त होत नसल्याने गाळयांच्या किंमत भांडवेलीकरण करुन येणा-या आजच्या किंमतीपेक्षा म्हणजे रुपये 2,61,352/- पेक्षा 20 टक्क्यांने कमी करण्यांचा प्रस्ताव आहे. याप्रमाणे परिगणीत केलेली गाळयाची किंमत रुपये 2,09,082/- दर्शवुन एक रक्कमी पध्दतीवर विक्री करण्याचा प्रस्ताव आहे,असे मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले.

यावर मंडळाचे सदस्य डॉ. शिंदे यांनी असे प्रतिपादन केले की, बाजारभावापेक्षा 20 टक्के कमी करुन प्रस्तावित केलेल्या किंमतीस मागणी अभावी रिक्त गाळयांची विक्री होऊन म्हाडाचा अडकलेला निधी मोकळा व्हावा, या दृष्टीने प्रस्ताव मान्य करावयास हरकत नाही. तथापी या किंमतीस मागणी प्राप्त न झाल्यास किंमत आणखी कमी करण्याबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या पुढील बैठकीपुढे ठेवण्यांत यावा. यास मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी सहमती दर्शविली व चर्चेअंती मंडळाने निर्णय घेतला की,

ठराव क्र 771 :- गट क्र. 104/1 तिसगांव औरंगाबाद येथील अल्प व मध्यम उत्पन्न गटातील मागणी अभावी रिक्त असलेल्या गाळयांची विक्री होऊन म्हाडाचा अडकलेला निधी मोकळा व्हावा या दृष्टीकोनातुन अल्प उत्पन्न गटातील गाळयांची किंमत रुपये 1,16,700/- प्रति गाळा व मध्यम उत्पन्न गटातील गाळयांची किंमत रुपये 2,09,082/- प्रति गाळा ठेवुन, एक रक्कमी पध्दतीवर विक्री करण्यास्तव त्वरीत जाहिरात देण्यांत यावी. व या किंमतीस मागणी प्राप्त न झाल्यास गाळयाची किंमत आणखी कमी करण्याबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या आगामी बैठकीपुढे ठेवण्यांत यावा. ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यांत यावी.

विषय क्र 2 :- शहर भूमापन क्रमांक 18348 भाग बन्सीलालनगर औरंगाबाद येथील मध्यम उत्पन्न गट 16 गाळयांपैकी मागणी अभावी रिक्त असलेल्या गाळयांची किंमत , प्राधिकरणाच्या धोरणानुसार कमी करणेबाबत.

सदर प्रकरणी मंडळाचे कार्यकारी अभियंता यांनी सविस्तर माहिती दिली. सदर माहिती देतांना कार्यकारी अभियंता यांनी असे सांगितले की, विषयाधीन योजनेतील गाळयांचे वाटप दिनांक 1/3/98 पासून सुरु करण्यांत आले. तथापी योजना राबविण्यापुर्वी ठोस मागणी प्राप्त असुनही प्रत्यक्ष गाळा वाटपापर्यन्त बहुंतांशी लाभार्थींनी त्यांच्या अनामत रक्कमा परत घेतल्या. मंडळाने प्रचलित धोरणानुसार परिगणीत केलेली गाळयांची विक्री किंमत स्थानिक बाजारभावापेक्षा जास्त झाल्याने तसेच हे गाळे बहुमजली इमारतीत असल्याने गाळयांना मागणी प्राप्त होत नाही, असे निदर्शनास आल्यावरुन प्राधिकरणाच्या दिनांक 23/4/1998 च्या मार्गदर्शक तत्वानुसार सदर गाळयांची किंमत कमी करुन प्रथम गाळा वाटपाच्या वेळेस असणारी म्हणजे रुपये 2,40,000/- प्रति गाळा एवढी ठेवण्यांत यावी असा मंडळाच्या जुलै 1998 साली झालेल्या बैठकीत ठराव क्र. 657 अन्वये निर्णय घेण्यांत आला. त्यानुसार आजपर्यन्त ब-याच जाहिराती देऊनही प्रतिसाद मिळाला नाही. तसेच गाळे वाटपाबाबतच्या अटी शिथील करुन जसे उत्पन्न मर्यादा रदद करणे, एका लाभार्थीस एका पेक्षा जास्त गाळे वितरीत करणे, अशा जाहिराती देण्यांत आल्या तथापी मागील पाच वर्षापासून मागणी अभावी या योजनेतील 08 गाळे शिल्लक आहेत यामुळे मंडळाचा रुपये 19.20 लक्ष एवढा निधी अडकला आहे. सदरचा निधी मोकळा होण्याच्या दृष्टीने कमी केलेल्या किंमतीपेक्षाही गाळयांची किंमत 20 टक्क्यांनी कमी करावी असा प्रस्ताव आहे. कमी केलेल्या किंममती पेक्षा गाळयांची किंमत 20 टक्क्यांनी कमी केल्यास प्रति गाळा किंमत रुपये 1,92,000/- एवढी येते मात्र मंडळास केवळ बाजार भावापेक्षा 20 टक्क्यांनी कमी करण्याचे अधिकार असल्याने सदरचा प्रस्ताव प्राधिकरणास सादर करणे आवश्यक आहे.

त्यावर मंडळाचे मा. सदस्य डॉ. शिंदे यांनी उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव प्राधिकरणास त्वरीत सादर करावा असे सुचविले त्यास मंडळाच्या सन्माननीय सदस्यांनी सहमती दर्शविली. उपरोक्त चर्चेअंती मंडळाने निणर्य घेतला की,

<u>ठराव क्र .772</u> :- शहर भूमापन क्र.18348 भाग बन्सीलालनगर, औरंगाबाद. येथील 16 गाळे मध्यम उत्पन्न गट योजनेमधील मागणी अभावी रिक्त असलेल्या गाळयांची किंमत प्राधिकरणाच्या धोरणानुसार रुपये 2,40,000/- अशी एकदा कमी केल्यानंतर पुन्हा कमी केलेल्या किंमतीपेक्षा 20 टक्क्यांनी कमी म्हणजे रुपये 1,92,000/- प्रति गाळा एवढी करण्यांचा प्रस्ताव प्राधिकरणास मंजूरीस्तव त्वरीत सादर करण्यांत यावा. ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी.

उपरोक्तप्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर सभेचे अध्यक्ष यांचे परवानगीने सर्व सन्माननीय सदस्यांनी खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित केले.

1. मा. श्री. इनामदार सदस्य औरंगाबाद मंडळ यांनी असे प्रतिपादन केले की, लातूर येथे मंडळाच्या विभागीय कार्यालयासाठी व विश्रामगृहासाठी लातुर शहरात मोक्याच्या ठिकाणी कलम - 52 खाली जागा विकत घेण्यात यावी. यावर मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, कार्यकारी अभियंता लातूर यांचेकडुन लातुर शहरात जागेच्या उपलब्धतेबाबत अहवाल घेऊन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

2. मा. सदस्य श्री. इनामदार यांनी असे सांगितले की, ग्रामीण भागात मंडळाच्या गृहनिर्माण योजना मोठया प्रमाणावर राबविण्यासाठी मंडळाचे जिल्हा गृहनिर्माण अधिकारी यांनी त्या त्या जिल्हयातील मंडळाचे सदस्य यांचेशी संपर्कात राहुन जमिन संपादनाचे कलम - 41 व कलम - 52 खालील प्रस्ताव तयार करावेत. म्हणजे ग्रामीण भागात योजनांसाठी जमिनी उपलब्ध होऊ शकतील. यावर मुख्य अधिकारी यांनी, कार्यकारी अभियंता औरंगाबाद / लातुर तसेच सर्व जिल्हयाचे उपअभियंता तथा जिल्हा गृहनिर्माण अधिकारी यांना या प्रमाणे सुचना देण्यांत येतील असे सांगितले. तसेच पुढे असेही सांगितले की, म्हाड अधिनियमातील कलम - 41 अन्वये जमिन संपादनास वेळ लागतो. त्यामुळे म्हाड कलम - 52 अन्वये जास्तीत जास्त जमिन संपादनाचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी जमिनीची निवड करणे, तसेच त्याचे मुल्यांकन ठरविणे यासाठी प्राधिकरणाची मंजूरी आवश्यक असते यामुळे होणारा विलंब टाळण्यासाठी जमिन निवडीची प्रक्रिया पुर्ण करणे व शासनाने ठरवुन दिलेल्या रेडीरेकनरच्या आधारे होणा-या किंमतीस खाजगी जमिन विकत घेणे यासाठी विभागीय मंडळ व मुख्य अधिकारी यांना अधिकार प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणास सादर करण्यांत येईल.

3. मा. सदस्य श्री. सावे व श्री. इनामदार यांनी बैठकीत असे सांगितले की, लातुर येथील विभागीय कार्यालयातुन जे अधिकारी / कर्मचारी इतरत्र बदलुन गेले आहेत त्यांच्या बदलीने जे अधिकारी / कर्मचारी नियुक्त केले आहे ते अदयापही लातुर येथे कामावर हजर झालेले नाहीत. त्यामुळे लातूर येथील कामे खोळंबत आहेत. लातूर येथील विभागीय कार्यालयात मुळातच कर्मचारी कमी आहेत. त्यामुळे जे अधिकारी/कर्मचारी अदयाप कामावर हजर झालेले नाहीत. त्यांना लातूर येथे हजर होणेसाठी व त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करणेसाठी म्हाडा मुंबई कार्यालयाकडे पत्र लिहुन मंडळाच्यावतीने कळविण्यांत यावे, म्हणजे जे अधिकारी / कर्मचारी लातुर येथे बदलुन येणार आहेत ते लवकर उपलब्ध होतील जेणे करुन मंडळाचे काम वेगाने व त्वरेने होईल.

मुख्य अधिकारी यांनी याबाबत म्हाडा मुंबई कार्यालयास प्रस्ताव पाठविण्यांत येईल असे सांगितले.

4. मा. सदस्य डॉ. शिंदे यांनी असे सांगितले की, गृहनिर्माण भवनाजवळील मंडळाच्या औरंगाबाद येथील जुन्या मध्यम उत्पन्न गट योजनेपलिकडील लगतची खाजगी जमिन सध्या संपादनासाठी उपलब्ध आहे व ती जमिन गृहनिर्माण योजनेसाठी उपयुक्त आहे. त्यामुळे सदर जमिनीची विस्तृत माहिती जसे जमिनीची मालकी, एकुण क्षेत्र डिपी मधील स्थिती, इत्यादी बद्दलची माहिती मंडळाचे संबंधीत अधिकारी यांनी संकलीत करावी. म्हणजे सदर जमिनीच्या संपादनाची कार्यवाही करणे सुलभ होईल. यावर मुख्य अधिकारी यांनी सदर प्रकरणी कार्यकारी अभियंता औरंगाबाद यांना अहवाल सादर करण्यास्तव सूचना देण्यांत येतील, असे सांगितले.

5. मंडळाच्या प्रलंबीत प्रश्नी / अडचणी सोडविण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदयांची भेट घेऊन त्यांना विनंती करण्यांत यावी व यासाठी मंडळाचे मा. सभापती व सर्व सन्माननीय सदस्य यांनी सदर भेटीच्या वेळी उपस्थित असावे असा मुद्दा मंडळाचे मा.सदस्य सर्वश्री. डॉ. शिंदे, वाघचौरे, इनामदार व सावे यांनी उपस्थित केला व मा. मुख्यमंत्री महोदयांची सदर भेटीसाठी तारीख व वेळ घेण्यासाठी मा. सभापती यांचेमार्फत पत्र पाठविण्यांत यावे असे ठरले.

6. मंडळाचे मा. सदस्य सर्वश्री बबनराव देशमुख, डॉ.शिंदे, वाघचौरे यांनी मंडळाच्यावतीने वृत्तपत्रात देण्यांत येणा-या जाहिराती देण्याबाबतच्या पध्दतीविषयी विचारणा केली. यावर मंडळाचे मुख्य लेखा अधिकारी यांनी मंडळातर्फे देण्यांत येणा-या विविध जाहिराती या रोष्टर पध्दतीने देण्यांत येतात असे सांगितले. यावर रोष्टर पध्दत कशी अंवलंबीण्यात येते याबाबतची सविस्तर माहिती पुढील बैठकीत ठेवण्यांत यावी, अशा सूचना मुख्य लेखा अधिकारी यांना देण्यांत आल्या.

7. मंडळाचे मा. सदस्य सर्वश्री. वाघचौरे, इनामदार, सावे यांनी शहानुरवाडी औरंगाबाद येथील उच्च उत्पन्न गट योजनेच्या बांधकामाच्या प्रगतीबाबत विचारणा केली. सदर योजनेचे बांधकाम पुर्ण होण्यास विलंब होत आहे, त्यामुळे योजनेतील गाळे विलंबाने लाभार्थीना वाटप केल्यास लाभार्थीच्या तक्रारी येऊ शकतील व ते आर्थिक नुकसानाची मागणी करु शकतील, यासाठी अशा प्रकारचे संभाव्य आर्थिक नुकसान हे संबंधीत कंत्राटदाराकडुन वसुल करणे आवश्यक आहे. तसेच योजनेच्या गुणवत्ता व दर्जाबाबत योग्य नियंत्रण व देखरेख ठेवणे आवश्यक आहे असे सांगितले.यावर मुख्य अधिकारी यांनी मंडळास अशी माहिती दिली की, प्राधिकरणाच्या मंजूरीनुसार कंत्राटदारास दिनांक 7/7/2003 ते 16/8/2003 या कालावधीसाठी रुपये 1000/- प्रतिदिन असा

दंड आकारण्यांत आले आहे. सदर कामावर योग्य ते नियंत्रण व देखरेख ठेवून काम लवकरात लवकर पुर्ण करुन घेण्याच्या सूचना कार्यकारी अभियंता औरंगाबाद यांना देण्यांत आल्या आहेत.

शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.